# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर- ४१६००४

**परिपत्रक /क्र.कोविमं./माध्य.परीक्षा /** 527

**दिनांक :-** ०५/०६/२०२३
06 JUN 2023

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा, सातारा / सांगली/ कोल्हापूर.

**विषय :- मार्च २०२३ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मूळ गुणपत्रिका वितरणाबाबत..**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, **मार्च २०२३** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस आपल्या शाळेमार्फत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका व तपशीलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख, यांचे वाटप माध्यमिक शाळांना **बुधवार दिनांक १४/०६/२०२३ रोजी सकाळी ११.००** वा. मंडळाच्या अधिकृत वितरण केंद्रमार्फत करण्यात येणार आहे याची सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांनी नोंद घ्यावी. साहित्य घेऊन जाणेसाठी **आपले अधिकारपत्र व शिक्क्यासह** आपल्या शाळेचा प्रतिनिधी पाठवून साहित्य घेऊन जाणेची दक्षता घ्यावी. गुणपत्रिकांचे वाटप **बुधवार दिनांक १४ /०६/२०२३ रोजी दु.३.००** वा. विद्यार्थ्यांना करावयाचे आहे.

संबंधित शाळा विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार व सोईनुसार शासनाच्या सर्व नियमांचे व सुचनांचे पालन करुन गुणपत्रक वितरण करावे. विद्यार्थ्यांना विशिष्ट तारखेस गुणपत्रक घेऊन जाणेस आग्रह धरु नये. तसेच शाळेमध्ये पालक / विद्यार्थी यांची एकाच वेळी गर्दी होणार नाही याची दक्षता घेऊन नियोजन करावे.

गुणपत्रिका विद्यार्थ्यांना हस्तपोच देण्यापुर्वी शाळेच्या अभिलेखावरुन पडताळणी करुन **नावांतील स्पेलिंग, विषय इत्यादी सर्व माहिती बरोबर असल्याची व गुणपत्रिकेवर विभागीय सचिवांची स्वाक्षरी असल्याची खातरजमा करुन त्यानंतरच विद्यार्थ्यांना देण्यात यावे.** त्रुटी असणारे गुणपत्रक कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना देण्यात येऊ नये. गुणपत्रकात कोणतीही त्रुटी असल्यास तसेच गुणपत्रकांची संख्या कमी अधिक असल्यास विनाविलंब मंडळाशी संपर्क साधावा. **त्रुटी असणाऱ्या गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत दिनांक १३/०७/२०२३ पूर्वी मंडळाकडून दुरुस्त करुन घेणेबाबत दक्षता घ्यावी. दुरुस्ती प्रस्तावासोबत योग्य ते दुरुस्ती शुल्क तसेच प्रमाणित केलेली माध्यमिक शाळेच्या जनरल रजिस्टरच्या पानाची छायांकित प्रत सादर करावी.** तसेच यापूर्वी दुरुस्ती का कळविली नाही याबाबतच्या खुलाशासह जनरल रजिस्टर घेऊन मुख्याध्यापक व प्रतिनिधींनी समक्ष मंडळ कार्यालयात आल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. त्यानंतर काही त्रुटी राहिल्यास त्यास आपली सर्वस्वी जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

**गुणपत्रिका दुरुस्तीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे -**

**१. शाळेचे शिफारस पत्र** **२.मुळ गुणपत्रक**
**३. जनरल रजिस्टरची प्रमाणित छायांप्रत -** जनरल रजिस्टर मराठीत असल्यास विद्यार्थ्यांच्या आधारकार्डची छायांप्रत
**४. लिपिकांनी मुख्याध्यापकांना दिलेला खुलासा (प्रिलिस्ट दुरुस्ती का कळविली नाही याबाबत)**
**५. मुख्याध्यापकांनी मंडळास दिलेला खुलासा** **६. दुरुस्ती शुल्क रु.१५०/-**

तरी सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुखांनी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सर्व सूचनांची नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी. तसेच **सर्व वितरण केंद्रांनी निकाल पोहोच भरुनच गुणपत्रिकांचे वितरण करावे.**

(डी.एस. पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

**महत्वाचे :- मार्च २०२३ परीक्षेसाठी श्रेणीसुधार योजनेअंतर्गत (Class Improvement) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी मार्च २०२३ परीक्षेच्या मुळ गुणपत्रिका माध्यमिक शाळांना वितरीत केलेच्या दिनांकानंतर पुढील एक महिन्यापर्यंत विकल्प देणे अनिवार्य राहील. तसेच गुणपत्रिका वितरीत केलेच्या दिनांकानंतर पुढील सहा महिन्यापर्यंत जादा शुल्क आकारुन विकल्प स्विकारता येईल. या कालावधीत विकल्प न दिल्यास मार्च २०२३ परीक्षेची संपादणूक रद्द करुन पूर्वीच्याच परीक्षेची संपादणूक ग्राह्य धरण्यात येईल याची नोंद घ्यावी व तसे संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात यावे.**